SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in
विद्यार्थी विकास विभाग
Dr. P. T. Gaikwad
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/ 2031 दि. २०/०२/२०२४

प्रति,
**मा. अधिविभागप्रमुख/ संचालक/ समन्वयक,**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:— शिवस्पंदन महोत्सव २०२३—२०२४ बाबत.**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष सन २०२३—२०२४ मधील विद्यापीठस्तरीय शिवस्पंदन महोत्सव दि. २१ फेब्रुवारी, २०२४ ते २३ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिका सोबत जोडली आहे. तरी सदर कार्यक्रम पत्रिकेनुसार शिवस्पंदन महोत्सवाचा आनंद घेण्यासाठी आपण उपस्थित रहावे तसेच आपल्या अधिविभागातील प्रशासकीय सेवक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांना सदर महोत्सवासाठी उपस्थित राहणेबाबत सुचना देण्यात यावी.

**शिवस्पंदन महोत्सव स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धकांसाठी सुचना —**

१. सोबत जोडलेल्या कार्यक्रम पत्रिका प्रमाणे सर्व स्पर्धा वेळेत चालू होणार आहेत. त्यामुळे आपल्या अधिविभागामधील सहभाग घेतलेल्या विद्यार्थी स्पर्धकांनी वेळेच्या अगोदर अर्धा तास आपली नोंदणी करणेसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.
२. स्पर्धक विद्यार्थी—विद्यार्थीनींनी आपले विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र व चालू वर्षातील प्रवेश पावती नोंदणी वेळी सादर करणे बंधनकारक आहे.
३. सदर स्पर्धेच्या दिवशी सकाळी सर्व विद्यार्थ्यांनां व संघास कोड नंबर दिले जातील.
४. कोड नंबर प्रमाणे स्पर्धकास/संघास सादरीकरण करणे बंधनकारक आहे. विहित वेळेत स्पर्धक/संघ उपस्थित न राहिल्यास त्याची प्रवेशिका रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उद्घाटनाच्या औचित्याने **दि. २१/०२/२०२४ रोजी मुख्य प्रशासकीय इमारत ते वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृह या मार्गावरुन सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत सांस्कृतिक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे**. सदर रॅलीसाठी आपल्या अधिविभागातील विद्यार्थ्यांना **पारंपारीक वेशभुषेमध्ये** उपस्थित राहणेबाबत सुचना देण्यात यावी हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
विद्यार्थी विकास